# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक) परिच्छेद क्रमांक ४.२, ४.३ व ४.४ यावरील समितीचा**

# चौथा अहवाल

( दिनांक डिसेंबर, २००६ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.

# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक) परिच्छेद क्रमांक ४.२, ४.३ व ४.४ यावरील समितीचा**

# चौथा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती
## (२००५- २००६)

| | |
|---|---|
| | **समिती प्रमुख** |
| (१) | श्री. नाना पटोले, वि.स.स. |
| | **समिती सदस्य** |
| (२) | श्री. सुरेश वरपूडकर, वि.स.स. |
| (३) | श्री. बशीर मुसा पटेल, वि.स.स. |
| (४) | श्री. रमेश कदम, वि.स.स. |
| (५) | श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स. |
| (६) | श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स. |
| (७) | श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स. |
| (८) | श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स. |
| (९) | श्री. पी.यु.मेहता, वि.स.स. |
| (१०) | श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स. |
| (११) | श्री. मदन पाटील, वि.स.स. |
| (१२) | श्री. हरिदास भदे, वि.स.स. |
| (१३) | श्री. अरविंद नेरकर, वि.स.स. |
| (१४) | श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स. |
| (१५) | श्री. प्रतापराव जाधव, वि.स.स. |
| (१६) | श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स. |
| (१७) | श्री. अरुण पाटील, वि.स.स. |
| (१८) | डॉ. विनय नातू, वि.स.स. |
| (१९) | श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स. |
| (२०) | श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स. |
| (२१) | श्री. संजय दत्त, वि.प.स. |
| (२२) | श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स |
| * (२३) | श्री. वसंत काळे, वि.प.स. |
| (२४) | श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. |
| (२५) | श्री.अरविंद सावंत, वि.प.स. |

*श्री. वसंत काळे, वि.प.स. समिती सदस्य यांचे दिनांक २ फेब्रुवारी, २००६ रोजी निधन झाल्यामुळे रिक्त.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास पाटील, प्रधान सचिव (१)
श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी
श्री. अ.ल. जोशी, कक्ष अधिकारी

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | |
| एक | **महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ** (ले.प.अ. २००२-२००३) | |
| (१) | **"जमिनीचे कमी मूल्यांकन"**<br>(परिच्छेद क्रमांक ४.२) | |
| (२) | **"खाजगी संस्थेला अदेय फायदा"**<br>(परिच्छेद क्रमांक ४.३ ) | |
| (३) | **"प्रतिभूतीच्या अभावामुळे कर्जाची वसुली न होणे"**<br>(परिच्छेद क्रमांक ४.४ ) | |
| दोन | **बैठकीचे परिशिष्ट** | |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००२-२००३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक) प्रकरण चार मधील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक ४.२ ,४.३ व ४.४ यावरील समितीचा चौथा अहवाल (अकरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

सांस्कृतिक कार्य विभाग व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर व माहितीवर समितीने विचार केला. बुधवार, दिनांक १४ जून २००६ रोजी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींची व विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

श्री. जी. एन. सुंदरराजा, महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा परिक्षा) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकांना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव श्रीमती संजीवनी कुट्टी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, यांनी दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे सुध्दा आभार मानते.

समितीने ----वार, दिनांक ---- २००६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

**नाना पटोले,**<br>समिती प्रमुख,<br>सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,<br>नागपूर, ---वार, दिनांक, २००६.

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित :-

### एक : "जमिनीचे कमी मूल्यांकन"

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.२ मध्ये **"जमिनीचे कमी मूल्यांकन"** याबाबत महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

कंपनीने जमिनीचे मूल्यांकन रुपये २८.२० कोटीने कमी करुन खाजगी संस्थेला अदेय फायदा दिला होता.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने चित्रपट व दूरचित्रवाणी प्रशिक्षण संस्था, संशोधन संस्था व कलागार संकूल यांचे एकात्मिक संस्थापित करण्यासाठी मुक्ता आर्ट मर्यादित, मुंबई (संस्था) एक संयुक्तिक प्रकल्प करार (विसलिंग वुड आंतरराष्ट्रीय खाजगी मर्यादित) करारबध्द केला (ऑक्टोबर २०००) होता.

लेखापरिक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या -

- कोणत्याही स्पर्घात्मक बोली न मागवता व संचालक मंडळाची मान्यता न घेता व्यवस्थापकीय संचालकाने हा निर्णय घेतला होता.
- कंपनीने जमीन हस्तांतरित करणे अनियमित होते कारण कंपनी जमिनीची मालक नव्हती व त्याबाबत शासनाची पूर्व परवानगी घेण्यात आली नव्हती.
- करारामध्ये असे नमूद केले होते की, संयुक्त प्रकल्पाचे भांडवल रुपये २० कोटी असेल त्यापैकी रुपये १७ कोटी (८५ टक्के) संस्थेने गुंतवायचे होते तर रुपये तीन कोटी (१५ टक्के) कंपनीने गुंतवायचे होते. त्याचप्रमाणे महसुलाची विभागणी ८५ :१५ या गुणोत्तरात विभागावयाची होती. कंपनीचा भाग म्हणून संयुक्त प्रकल्पाला हस्तांतरित करण्यात आलेल्या २० एकर (८०,००० चौरस मीटर) जागेचा बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्या विभागासाठी अधिसुचित केलेला प्रचलित दर रुपये ३,९०० प्रति चौरस मीटर असतांना कंपनीने

जमिनीचा दर चुकीने रुपये ३७५ प्रति चौरस मीटर एवढाच दाखविला होता. जमिनीच्या कमी मूल्यांकनाचे दोन परिणाम होते.

- कंपनीने भांडवलाचे अंशदान रुपये ३१.२० कोटी ऐवजी फक्त रुपये तीन कोटी एवढेच दाखविण्यात आले व अशारितीने जमिनीचे मूल्यांकन रुपये २८.२० कोटीने कमी दाखविण्यात आले होते.
- दिलेल्या अंशदानाच्या आधारावर कंपनीला मिळावयाचा महसूल ६४.७३ टक्क्यांऐवज १५ टक्के एवढाच मिळणार होता.

व्यवस्थापनाने उत्तरात (जुलै-ऑगस्ट-२००३) म्हटले होते की, या कराराबाबत पुनर्वाटाघाटी करण्यात येतील. परंतु सध्या अस्तित्वात असलेला करार रद्द करण्यात आला नव्हता (सप्टेंबर २००३). या कमी मूल्यांकनाला जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती.

ही बाब शासनाला कळविली (जून २००३) होती, उत्तर मिळाले नव्हते (नोव्हेंबर २००३)

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, विषय क्र.७२/९३ च्या संदर्भातील संचालक मंडळाच्या ७२ व्या बैठकीच्या विषयसूची व इतिवृत्तावरुन असे दिसून येते की, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी मे. मुक्ता आर्टस् लि. चा प्रस्ताव संचालक मंडळापुढे दिनांक २०/५/२००२ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीत प्रथमत: सादर केला होता. या विषयावरील टिप्पणीत असे नमूद केले आहे की, मे. मुक्ता आर्टस् लि. यांच्याकडून चित्रपट प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्यात पुढे असेही नमूद केले आहे की, इतर कोणाकडूनही असा प्रस्ताव आलेला नाही. तथापि, संचालक मंडळापुढे हा विषय सादर करताना तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी अशी प्रकारच्या प्रस्तावासंदर्भात निविदा मागविण्याबाबत गरज प्रतिपादित केली नव्हती. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी निविदा न मागविण्याकरीता अथवा स्पर्धात्मक बोली न मागविण्याकरीता संचालक मंडळाची मान्यता घेतल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन दिसून येत नाही. मात्र ठराव क्र.७२/१३

अन्वये संचालक मंडळाने या प्रस्तावास मान्यता दिल्याचे दिसते. हा ठराव खालीलप्रमाणे आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर संचालक मंडळाने साधक बाधक चर्चा करुन प्रस्तावास मान्यता दिली व प्रस्तावाची अधिक छाननी करुन मात्र किती जमीन लागणार आहे याबद्दल अधिक सविस्तर माहिती घ्यावी तद्नंतर मा. मंत्री महोदय (सांस्कृतिक कार्य) व महामंडळाचे अध्यक्ष निर्णय घेतील."

तथापि, याबाबत असा तपशीलवार प्रस्ताव सादर झाल्याचे कार्यालयात उपलब्ध अभिलेख्यावरुन दिसून येत नाही.

यासंदर्भात तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे काही कागदपत्रे/ माहिती उपलब्ध आहे काय, आणि त्यांना या विषयी असलेली माहिती देण्याबाबत विनंती करणारे पत्र त्यांना पाठविण्यात आले आहे.

हा आक्षेप योग्य असल्याचे दिसते. कारण जमीनीची माहिती शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे आहे आणि अशा प्रकारे जमीन देणेकरीता शासनाची पूर्व परवानगी घेतली असल्याबाबत अभिलेख / नस्ती इ. उपलब्ध कागदांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे या संदर्भात तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे पत्र पाठवून विचारणा करण्यात आली आहे. लेखा आक्षेपांत नमूद केल्याप्रमाणे जमीनीचे मूल्यांकन रु.२८.२० कोटीने कमी दाखविण्यात आल्याचे दिसते. जागेचे अंतिम मूल्यांकन सहाय्यक संचालक, नगर रचना, यांच्याकडून करुन घ्यावयाचे असते. जमिनीची किंमत रु.३ कोटी कशी काढली याबाबत कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांत उल्लेख आढळून येत नाही. तसेच मुल्यांकन कमी दाखविल्यामुळे दिलेल्या अंशंदानाच्या आधारावर कंपनीला मिळावयाचा महसूल कमी प्रमाणात मिळणार हा आक्षेप ही योग्य आहे असे दिसते. या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

यासंदर्भात सादर करण्यात येते की, महालेखापालांनी काढलेले आक्षेप लक्षात घेता, संचालक मंडळाने संयुक्त कराराचे मूळ स्वरुप बदलू ते भाडेपट्टयावर जमीन देण्यासाठी (Lease deed) करार असे करण्याबाबतचा निर्णय घेतला. असे करताना

त्यासंदर्भातील प्रचलित नियम आणि शासनाचे आदेश इ. लक्षात घेऊन करारात बदल करावा असाही निर्णय घेण्यात आला. संचालक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत ठराव क्रमांक ८३/३/०५ प्रमाणे संचालक मंडळाने असे ठरविले की, भाडेपट्टा तत्वावर जमीन मे. व्हिसलिंग वुडस इंटरनॅशनल लि. यांना देण्यात यावी. मात्र असे करताना संबंधीत शासन आदेशांचे आणि नियमांना अनुसरुन कार्यवाही व्हावी. शैक्षणिक कार्यासाठी ४ एकर जागा आणि मनोरंजनाच्या कारणाकरीता १६ एकर जागा देण्याचा प्रस्ताव शासनास पाठवून त्यावर शासनाचा महसूल, वित्त, शिक्षण इ. विभागांचे अभिप्राय आणि मान्यता घेऊन याबाबतच्या नियमांच्या आणि या संदर्भातील शासन आदेशातील अटी / शर्तीच्या आधारे जमीन देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात यावा. असे संचालक मंडळाने ठरविले. संचालक मंडळाने असाही ठराव पारित केला की, मे. व्हिसर्लींग वुडस् इंटरनॅशनल लि. यांना व्यावसायिक तत्वावर चालविण्याकरीता कलागरे बांधण्याची परवानगी देण्यात येऊ नये. अन्यथा, चित्रनगरीला त्यापासून नाहक स्पर्धा निर्माण होऊन चित्रनगरीच्या व्यावसायावार अनिष्ट परिणाम होऊ शकेल. याच ठरावात पुढे असेही नमूद करण्याता आले आहे की, सध्या अस्तित्वात असणारा (Joint Venture Agreement) रद्द करण्यात यावा. दिनांक १ फेब्रुवारी २००३ पासून अथवा ज्या वर्षात जमीन अंतिमत: दिली जाईल त्या वर्षाच्या १ जानेवारी पासून नवीन करार करण्यात यावा. ठरावात संचालक मंडळाने नमूद केलेल्या विविध अटी/शर्ती पाहता, मूळ कराराचे Joint Venture Agreement हे स्परुप बदलून ते भाडेपट्ट्यावर जमीन देण्यासाठी (Lease deed) करण्याचा आणि तसा प्रस्ताव शासनास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव शासनास दिनांक २०/६/२००३ रोजी सादर करण्यात आलेला आहे. तथापि, जोपर्यंत नवीन करार अस्तित्वात येत नाही तोपर्यंत जुना करार मात्र सुरु राहणार ही वस्तुस्थिती आहे. नवीन व्यवस्था केवळ जमीन भाडेपट्टा देण्यापुरताच मर्यादित राहील व Whisting Woods या संस्थेला ही जमीन फक्त शैक्षणिक प्रयोजनासाठीच वापर करता येईल. समभाग विक्रीमुळे कोणती नवीन मॅनेजमेंट आल्यास किंवा कंपनीचे नाव बदलल्यास किंवा इतर काही अंतर्गत झाले तरी या सगळ्या बाबी लक्षात घेऊन नवीन कंपनी किंवा नवीन Management यांना सुध्दा

या करार अंतर्गतच्या सगळ्या अटी लागू राहतील. तसेच जमीनीचा प्रयोग फक्त शैक्षणिक कार्यासाठीच करता येईल. इतर कोणत्याही कार्यासाठी जमीनीचा प्रयोग आढळल्यास हा करारनामा आपोआप रद्द होईल व शासन / चित्रनगरीला जमीन परत घ्यावयाचा पूर्ण अधिकार राहील असाही निर्णय संचालक मंडळाने घेतला.

दरम्यान यासंदर्भात उच्च न्यायालयात दोन दावे दाखल झाले आहेत. श्री. अब्दुल हमीद पटेल यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक १८२६/२००३ दाखल केलेली असून यात दिनांक २४/१०/२००४ चा करारनामा रद्द करण्याचा आदेश देण्याची विनंती मा. उच्च न्यायालयाला केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने कुठलेही अंतरिम आदेश न देता प्रकरण दाखल करुन घेतले आहे. मात्र या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"आमच्या मते ह्या प्रकरणात अंतरिम आदेश द्यावे असे हे प्रकरण नाही. मात्र हे स्पष्ट करण्यात येते की, प्रतिवादी क्र.१० कडून करण्यात येणारी सर्व कार्यवाही आणि बांधकाम या रिट याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या तसेच पुढील आदेशाच्या अधिन राहून असेल व त्याबाबत त्यांना कुठलीही इक्वीटी मागता येणार नाही." मे.पीडीआर व्हीडीओट्रानिक्स या संस्थेने दुसऱ्या एका दाव्याद्वारे मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र.९७/२००३ दाखल केली आहे. सदर याचिकेत मे.पीडीआर यांचे म्हणणे असे आहे की, मे. मुक्ता आर्टस् लि. सोबत केलेल्या करारनाम्यातील जागा व ज्या जागेवर काम सुरु आहे त्या जागेवर मा. उच्च न्यायालयांतर्गत दिनांक ५/५/१९९७ चा मनाई हुकुम आहे. मे. पीडीआर व्हीडीओट्रॉनिक्स यांनी असा दावा केला आहे की, मा. उच्च न्यायालयाने भूखंड क्र.२२ वर कुठल्याही तिऱ्हाईत व्यक्ती किंवा संस्थेने हितसंबंध निर्माण करु नये. व ज्या जागेवर व्हिसलींग वुडस संस्थेचे काम सुरु आहे ती जागा भूखंड क्र.२२ आहे. हे प्रकरण सुध्दा मा. उच्च न्यायालयाने दाखल करुन घेतले असून त्यात महामंडळ व श्री. गोविंद स्वरुप यांना न्यायालयाच्या अवमान प्रकरणी दोषी का धरण्यात येऊ नये. याबद्दल कारणे दाखवा नोटीस काढली आहे.

मा. उच्च न्यायालयात दावा प्रलंबित असल्याने व हा विषय न्यायप्रविष्ट असल्याने यासंदर्भात सद्य:स्थितीत महामंडळाला करार रद्द करण्याबाबत काहीही कार्यवाही करता येणार नाही.

या कमी मुल्यांकनाला जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नव्हती असा आक्षेप आता महालेखापालांनी नमूद केलेला आहे. मूळ आक्षेपात ह्या बाबींचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता.

यासंदर्भात सादर करण्यात येते की, अशाप्रकारे जमीन देण्याबाबत नस्ती अथवा जमीनीचा तपशील देणारी टिप्पणी किंवा जमीनीच्या मूल्यांकनाबाबत इतर कागदपत्रे या कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नाहीत. केवळ करारनाम्याची मूळ प्रत कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध आहे. त्या प्रतीवर महामंडळातर्फे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्परुप यांनी स्वाक्षरी केलेली आहे. या करारनाम्याबाबत संचालक मंडळाच्या ७५ व्या सभेत उल्लेख असल्याचे त्या सभेच्या इतिवृत्तावरुन दिसून येते. त्या सभेत संचालक मंडळाचा ठराव खालीलप्रमाणे आहे.

"मुक्ता आर्टस् यांच्या सोबत व्हिसलिंग वुडस् इंटरनॅशनल लि. या शैक्षणिक संस्थेचे ५ वर्षानंतर फायद्याचे अवलोकन करुन संस्थेस अधिक फायदा झाल्यास दोघांच्या सहमतीने करारनाम्यात बदल करण्याचा विचार करावा."

यावरुन त्यावेळी संचालक मंडळाने मूळ करारनाम्यास (मे.मुक्ता आर्टस् यांच्याशी केलेला) मान्यता दिली अथवा नाही हे स्पष्टपणे नमूद केलेले नसले तरी त्यांचा उद्देश संस्थेस जागा देण्याचा असावा. असे दिसते. विषय क्रमांक ७३/८ च्या ठरावासोबतच्या टिप्पणीत असे नमूद केले आहे की, या विषयाचा तपशीलवार अहवाल वेगळ्या नस्तीतून महामंडळाच्या मा. अध्यक्षाकडे सादर करण्यात आलेला असून त्यात या कारणाकरीता कोणती जागा इ. बाबींवर सखोल मंथन करण्यात आले आहे. मात्र अशा प्रकारची नस्ती महामंडळाच्या अभिलेख्यात उपलब्ध होत नाही. त्यामुळे जमीनीच्या कमी मूल्यांकन संदर्भात तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांकडे याबाबत विचारणा केली आहे व कराराबाबत त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे. कारण याबाबतची माहिती उपलब्ध अभिलेख्यावरुन मिळत नाही.

१.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाबाबत शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या मताशी शासन सहमत आहे. जॉईन्ट व्हेन्चर करारनामा बदलून त्याऐवजी भाडे करारनामा करण्याबद्दलचा हा मंडळाचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. नवीन करारनामा होईपर्यंत जुना करारनामा अस्तित्वात राहणार तसेच हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. उच्च न्यायालयाच्या विचाराधीन असताना हा करारनामा रद्द करण्याचा निर्णय घेता येणार नाही. संबंधित कागदपत्र उपलब्ध नसल्याचे जॉईन्ट व्हेन्चर करारनाम्याच्या संदर्भात लेखा आक्षेपाची मुद्यांबाबतची माहिती महामंडळाने तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांकडून मागविली असल्याचे महामंडळाने निदर्शनास आणले आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर जबाबदारी निश्चित करण्याबद्दलची आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

१.४ महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट व रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी या मुद्याच्या सद्यस्थितीबाबत समितीने विचारणा केली असता, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांनी विषद केले की, या प्रकरणात दिनांक २४/१०/२००० रोजी संयुक्त प्रकल्प करार करण्यात आला. प्रकल्पामध्ये मुक्ता आर्टस लिमिटेड यांच्यासोबत २० एकर जमिनीवर प्रशिक्षण संस्था उभारण्याचे ठरविले होते. जमिनीची किंमत ३ कोटी रुपये परिगणित करण्यात आली. या संयुक्त प्रकल्पामध्ये चित्रनगरीचा हिस्सा १५ टक्के व मुक्ता आर्टस्‌चा हिस्सा ८५ टक्के होता. करारामध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आक्षेप आहे. वास्तविक असा करार करताना पब्लीक बोली किंवा निविदा मागविणे आवश्यक होते. तसे न करता मुक्ता आर्टस्‌ या एकाच पार्टीबरोबर करार करण्यात आला असा आक्षेप होता. दुसरा आक्षेप जमिनीच्या मूल्यांकनाबाबत होता. जमीन शासनाची असताना संचालकांनी आपल्या पातळीवर शासनास न कळविता करार केला. जमिनीचे मूल्यांकन ३ कोटी रुपये करण्यात आले. जमिनीचे मूल्यांकन ३१ कोटी रुपयांपेक्षा जास्त असावे असे मुंबई महापालिका कायद्याच्या दरपत्रकाच्या आधारे महालेखापालांनी परिगणना करुन

आक्षेप घेतला आहे. शिवाय कराराच्या अटी व शर्ती मुक्ता आर्टस्‌ला झुकते माप देणाऱ्या असून महामंडळाला महत्त्वाचे स्थान नसल्याचा आक्षेप आहे. पुढे त्यांनी अशीही माहिती दिली की, संचालक मंडळापुढे याबाबत मोघमच प्रस्ताव ठेवण्यात आला होता. महालेखाकारांनी अहवाल सादर केल्यानंतरच शासनाच्या लक्षात आले. त्यापूर्वी का लक्षात आले नाही हे सांगणे कठिण आहे. श्री. गोविंद स्वरुप हे व्यवस्थापकीय संचालक असेपर्यंत हा विषय शासनाच्या नजरेस येऊ शकला नाही. लक्षात आल्यानंतर विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला व जबाबदारी निश्चित करण्याचे काम सुरु झाले. चार्जशिट २००६ साठी तयार करुन सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली आहे. यामध्ये विलंब लागण्याचे कारण देण्यात आले की, या प्रकरणी आव्हान देणारी जनहित याचिका २००३ मध्ये हायकोर्टात दाखल झाली असून केस ॲडमीट करण्यात आली आहे. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक बदलून गेल्यानंतर नव्याने रुजू झालेले व्यवस्थापकीय संचालक श्री. संगीतराव यांनी आक्षेपांचा आढावा घेऊन अभ्यास केल्यानंतर संचालक मंडळापुढे विषय सादर केला. झालेला करार नियमबाह्य असून प्रचलीत नियमाने भाडेपट्टीने जमीन देता येईल काय यावर विचार करण्यात आला. शासन निर्णयानुसार विविध सल्ले घेऊन शैक्षणिक प्रयोजनासाठी जमीन देता येईल असा प्रस्ताव शासनास सादर केला. या प्रकरणी न्यायालयात खटला असल्याने निर्णय घेता येईल काय, म्हणून सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या निदेशानुसार सहाय्यक शासकीय अभियोक्ता यांचा सल्ला घेण्यासाठी शासनाने प्रस्ताव पाठविला. जमीन दिल्यानंतर चौकशी करण्यात वेळेचा अपव्यय का करण्यात आला, त्याचवेळी फौजदारी गुन्हा दाखल का करण्यात आला नाही व २००३ मध्ये श्री. सगीतराव यांनी या बाबी निदर्शनास आणल्या असताना कारवाई विलंबाने का सुरु केली. या प्रश्नावर खुलासा करताना प्रधान सचिव, सा.प्र. विभाग यांनी सांगितले की, सांस्कृतिक कार्य विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती प्राप्त झाल्यानंतर विभागीय चौकशीचा प्रस्ताव तयार करुन मा. मुख्यमंत्र्यांकडे सादर केला आहे. त्यांचे आदेश होताच चौकशी सुरु करण्यात येईल. याशिवाय फौजदारी कारवाई करण्याच्या मुद्यावर गृह विभागाचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी सल्ला दिला

की, हे प्रकरण गंभीर असेल तर संबंधित विभागाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली पाहिजे. एका प्रश्नाला उत्तर देताना विभागाच्या सचिवांनी सांगितले की, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप हे सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव देखील होते. सध्या ते रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहेत. विभागीय चौकशीमध्ये महामंडळाला अंधारात ठेऊन व्यवहार झाला हे महामंडळाच्या सचिवांनी मान्य करुन सांगितले की, यासंदर्भात दोषारोपत्रामध्ये सर्व मुद्यांचा अंतर्भाव करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याकरिता प्रस्ताव सादर केला आहे, कारवाई होणेही आवश्यक आहे.

समितीने चित्र नगरीला भेट दिली त्यावेळी श्री. गोविंद स्वरुप यांनी २० कोटी रुपयांचे बॉंड विक्रीला काढले होते असे एक प्रकरण उघडकीस आले. हे बॉण्ड बाहेरुन खरेदी करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालकांनी शासनाची परवानगी घेतली होती किंवा नाही याबाबतही समितीने शंका व्यक्त केली. त्यावेळी विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले की, २० कोटी रुपयांचे बॉण्ड काढण्यासाठी संचालक मंडळाची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची परवानगी घेण्यात आली नव्हती. पुढे असेही सांगण्यात आले की, यासंदर्भात लाचलुचपत विभागाकडून जो अहवाल प्राप्त झाला तो मा. मुख्यमंत्र्यांना १२ जून २००६ रोजी सादर करण्यात आला. यामध्ये विधी व न्याय विभागाचे आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे मत घेऊनच सर्व प्रक्रिया पूर्ण केली आहे. करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराचे हे प्रकरण असताना आणि संबंधित व्यक्तीची सेवानिवृत्ती जवळ (ऑगस्ट २००६) आली असतानाही या प्रकरणी मुद्दाम विलंब लावला जात आहे अशी शंका समितीने व्यक्त केल्यानंतर विभागाच्या सचिवांनी सांगितले की, गृह विभागाच्या अहवालामध्ये रु.१०.३० कोटींचा आर्थिक घोटाळा, लुबाडणूक, फसवणूक व गुन्हेगारी झाल्याचे म्हटले आहे. असे असताना श्री. गोविंद स्वरुप यांची व त्यांच्या नातेवाईकांची मालमत्ता सील का करण्यात आली नाही, तसेच त्यांच्या विरुध्द तात्काळ गुन्हा दाखल का करण्यात आला नाही. या पृच्छेवर विभागीय सचिवांनी सांगितले की, सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे अधिकार आहेत. इतरांना ते अधिकार नाहीत. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा अहवाल मा. मुख्यमंत्र्यांना

सादर झालेला आहे व तेच याबाबत पुढील कारवाई करणार आहेत. या संदर्भात समितीसमोर अशीही माहिती आली की, श्री. गोविंद स्वरुप यांच्या प्रकरणाच्या संदर्भात विधान परिषदेत प्रश्न उपस्थित झाला होता. तेव्हा सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी त्यावेळी सभागृहास आश्वासन दिले होते की, रोजगार आणि स्वयंरोजगार खात्याचे प्रधान सचिव, आणि गोरेगाव चित्रनगरीचे माजी व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांच्यावरील आरोपांची खातेनिहाय आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अशा दोन्ही चौकशा पूर्ण झाल्या आहेत ऑगस्ट ०६ च्या दरम्यान ते सेवानिवृत्त होणार आहेत. त्यापूर्वी अंतिम कारवाई केल जाईल. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून राज्य शासन कोणालाही पाठीशी घालणार नाही. व्यवस्थापकीय संचालक असताना त्यांनी राष्ट्रीय एकात्मता विषयावर "हमसब एक है" कार्यक्रमाचे आयोजन ५ शहरात करावयाचे ठरविले. त्यासाठी "झी" आणि "बीफोर यू" या टी.व्ही. कंपन्यांबरोबर १२ कोटीपेक्षा अधिक रुपयांचा व्यवहार करण्यात आला होता. ही रक्कम बँकेत जमा होती. नंतर हा कार्यक्रम रद्द करण्यात आला होता. मात्र जमा रकमेचा गैरव्यवहार करुन व अधिकाराचा गैरवापर करुन हे पैसे दुसरीकडे वळविले होते. यामध्ये १२ कोटीहून अधिक रकमेचा गैरव्यवहार झाला आहे.

१.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित या शासकीय कंपनीने चित्रपट व दूरचित्रवाणी प्रशिक्षण संस्था, संशोधन संस्था व कलागार संकूल यांचे एकात्मिक संस्थापित करण्यासाठी मुक्ता आर्ट मर्यादित, मुंबई या संस्थेशी संयुक्तिक प्रकल्प करार ऑक्टोबर २००० मध्ये करण्यात आला होता. यासाठी स्पर्धात्मक बोली न मागविता व संचालक मंडळाची मान्यता न घेता व्यवस्थापकीय संचालकांनी हा निर्णय घेतला होता. जमिनीची मालकी शासनाची असताना शासनाची पूर्व परवानगी घेण्यात आली नव्हती. संयुक्त प्रकल्पाचे भांडवल २० कोटी रुपये ठरविण्यात आले. त्यापैकी १७ कोटी (८५ टक्के) संस्थेने गुंतवायचे होते तर ३ कोटी (१५ टक्के) कंपनीने गुंतवायचे होते. महसूलाची विभागणी ८५.१५ या गुणोत्तरात विभागावयची होती. संयुक्त प्रकल्पाला हस्तांतरीत करण्यात आलेल्या २० एकर

(८०,००० चौ.मीटर) जागेची मुंबई महानगरपालिकेने त्या विभागासाठी अधिसूचित केलेला प्रचलित दर रु.३९००/- प्रती चौ.मी. असताना जमिनीचा दर ३७५ प्रती चौ.मी. दाखविला होता. कंपनीने भांडवलाचे अंशदान रुपये ३१.२० कोटी ऐवजी फक्त ३ कोटी एवढेच दाखविण्यात आले होते. परिणामी जमिनीचे मूल्यांकन २८.२० कोटी रुपयांनी कमी दाखविण्यात आले होते.कंपनीला मिळावयाचा महसूल ६४.७३ टक्क्याऐवजी १५ टक्के एवढाच मिळणार होता.

याप्रकरणी समितीला अनेक बाबीसंबंधी नियमबाह्यता, अनियमितता, गैरप्रकार, भ्रष्टाचार व व्यवस्थापकीय संचालकांची मनमानी दिसून आली. ही मालमत्ता त्यांच्या स्वत:च्या मालकिची आहे असे समजूनच व्यवस्थापकीय संचालकांचे वर्तन झाल्याचे समितीला स्पष्टपणे दिसून आले. प्रकरणाचा पूर्णपणे विचार केल्यानंतर हे अत्यंत चिड आणणारे प्रकरण आहे अशी समितीची खात्री पटली आहे. शिवाय २००३ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आणल्यानंतरही सांस्कृतिक कार्य विभागाने आणि सामान्य प्रशासन विभागाने याकडे जवळ-जवळ पूर्णत: दुर्लक्षच केल्याचे दिसते. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप हे ऑगस्ट २००६ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत हे स्पष्ट असताना, त्यांच्या संबंधात जून २००६ मध्ये सादर झालेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई झालेली नाही. प्रकरण २००३ मध्ये उघडकीस येऊनही चौकशी अहवाल २००६ पर्यंत सादर होण्यास लागलेला विलंब हा हेतूपुरस्सर होता असेच म्हणावे लागेल. या प्रकरणी थोडी थोडकी नाही २८.२० कोटी रुपयांनी शासकीय जमिनीची किंमत कमी दाखविण्यात आली आहे. तरीही सदर अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई न होता तो सुखरुप सेवानिवृत्त होतो याचा अर्थ संबंधितानी सदर अधिकाऱ्यास पूर्णपणे पाठिशी धातले आहे हे स्पष्ट आहे. स्पर्धात्मक बोली वा निविदा मागविल्या असत्या तर या प्रकरणी शासनाचे नुकसान न होता फायदा झाला असता परंतु तसे मुद्दामच करण्यात आले नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. शिवाय याप्रकरणी संचालक मंडळाची मान्यताही नाही म्हणून हे प्रकरण नियमबाह्य ठरते. जमिनीची मालकी शासनाची असतानाही शासनाची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता सनदी अधिकारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस वाटू नये याचे समितीस आश्चर्य वाटते.

शिवाय करारात झुकते माप सर्वस्वी मुक्ता आर्ट मर्यादितला देण्यात आले आहे. यात महामंडळाच्या फायद्याचा कोणताच विचार करण्यात आलेला नाही. यामध्ये संस्थेला ८५ टक्के तर महामंडळाला महसूली विभागणी केवळ १५ टक्के मिळणार होती हे देखिल समितीस आश्चर्य वाटते.

श्री. गोविंद स्वरुप हे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक होते व त्याचवेळी ते सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिवही होते. त्यामुळे या खात्याकडून त्यांच्याविरुध्द चौकशी सुरु होण्याची सूतराम शक्यता नव्हती. वास्तविक ही शासनाची सर्वात मोठी चूक आहे. त्यामुळे हे प्रकरण शासनास कळू शकले नाही. महालेखापालाच्या अहवालानंतरच हे प्रकरण लक्षात आले. त्यानंतरही त्यांच्याविरुध्द कोणतीही कठोर कारवाई झाल्याचे समितीला दिसून आले नाही. त्यांच्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे आवश्यक असताना तेही झालेले नाही. जी काय विभागीय चौकशी झाली तिचा अहवाल जून २००६ मध्ये मा. मुख्यमंत्र्यांना सादर झाला. परंतु श्री. गोविंद स्वरुप ऑगस्ट २००६ मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत या चौकशी अहवालावर कोणती कारवाई करण्यात आली हे गुलदस्त्यातच राहिले. वास्तविक त्या अहवालावर जर काही कारवाईचे आदेश झाले असते तर गोविंद स्वरुप हे सुखरुप सेवानिवृत्त न होता त्यांना त्यांच्या भ्रष्टाचाराची शिक्षा मिळाली असती. पण असे काही झाले नाही. याचा अर्थ असा की, त्या अहवालावर कोणत्याही कारवाईचे आदेश झालेले नसावेत. म्हणून समितीचे असे मत आहे की, शासनाने यामध्ये श्री. गोविंद स्वरुप यांना पूर्णपणे संरक्षणच दिले. अन्यथा यातून काहीतरी चांगले निष्पन्न झाले असते व शासनाचे नुकसान काही अंशी तरी भरुन निघाले असते व अशा पध्दतीने वागणाऱ्या अधिकाऱ्यांना धाक बसला असता म्हणून समिती याप्रकरणी अशी शिफारस करते की, या प्रकरणात महामंडळाचे व शासनाचे जे नुकसान झाले आहे ते भरुन काढण्यासाठी शासनाने श्री. गोविंद स्वरुप व त्यांच्या नातेवाईकांची सर्व मालमत्ता सिल करावी आणि त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा नोंद करुन त्याविरुध्द करता येईल तेवढी कडक कारवाई करावी. न्यायालयातही आवश्यकता वाटल्यास प्रकरण सादर करावे. याप्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा आणि वेळोवेळी सद्य:स्थिती कळविण्यात यावी.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितच्या तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी केलेल्या घोटाळ्याचे वरील एकच प्रकरण नाही तर घोटाळ्याचे दुसरेही एक प्रकरण समितीने चित्रपट नगरीस भेट दिली त्यावेळी उघडकीस आले व तेही अतिशय गंभीर स्वरुपाचे आहे. श्री. गोविंद स्वरुप यांनी २० कोटी रुपयांचे बॉण्ड विक्रीस काढले होते. हे बॉण्ड बाहेरुन खरेदी करण्यासाठी त्यांनी शासनाची परवानगी घेतली होती किंवा नाही हे स्पष्ट झाले नाही. तसेच बॉण्ड विक्रीस काढण्यासाठी त्यांनी संचालक मंडळाची परवानगीही घेतली नव्हती. या संदर्भात त्यांनी राष्ट्रिय एकात्मता विषयावर "हम सब एक है" कार्यक्रमाचे आयोजन ५ शहरात करावयाचे ठरविले. त्यासाठी झी आणि बी फोरयू या टि.व्ही कंपन्यांबरोबर १२ कोटी रुपयापेक्षा अधिक रकमेचा व्यवहार करण्यात आला. ही रक्कम बँकेत जमा होती. कार्यक्रम रद्द करण्यात आला मात्र जमा रकमेचा गैरव्यवहार करुन व अधिकाराचा गैरवापर करुन रक्कम दुसरीकडेच वळवण्यात आली. यामध्ये १२ कोटीहून अधिन रकमेचा गैरव्यवहार झालेला आहे.

श्री. गोविंद स्वरुप यांनी २० कोटी रुपयांचे बॉण्ड विक्रीस काढताना शासनाची परवानगी घेतली होती किंवा कसे हे समितीसमोर आलेले नाही. जर परवानगी घेतली असती तर शासनाच्या प्रतिनिधींनी तसे समितीसमोर स्पष्ट केले असते. परंतु ज्याअर्थी तसे स्पष्ट केले नाही त्याअर्थी त्यांनी परवानगी घेतली नव्हती या निष्कर्षाप्रत समिती येते. म्हणून समिती या प्रकरणी असे मत नोंदविते की, शासनाने यासंबंघातील सर्व माहिती समितीसमोर उघड केली पाहिजे तरच समितीला आपल्या अनुमानापर्यंत पोहचता येईल व त्या अनुषंगाने योग्य त्या शिफारशी करता येतील.

दुसरी बाब म्हणजे व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांनी या प्रकरणी संचालक मंडळाची मान्यताही घेतलेली नव्हती. म्हणजे ही बाब पूर्णत: बेकायदेशिर होती हे स्पष्ट आहे. समितीचे मत असे आहे की, संचालक मंडळाला या गोष्टीची कुणकुण लागलीच असेल किंवा उशिरा का होईना ही बाब समजली असेलच. परंतु संचालक मंडळाने याचा जाब व्यवस्थापकीय संचालकांना विचारल्याचे समितीसमोर आलेले नाही. जर संचालक मंडळ जागृत असते तर नक्कीच ही घटना घडली नसती व

एवढा मोठा भ्रष्टाचार, फसवणूक व लुबाडणूक झाली नसती. एखाद्या ऊच्चपदस्य व्यक्तिचा वरदहस्त असलेल्या व्यक्तीची मनमानी मोडण्यासाठी संचालक मंडळ ठाम व जागृत असणे आवश्यक आहे. परंतु संचालक मंडळच जर आपल्या अधिकारांबाबत जागृत नसेल तर अशा गोष्टी घडू शकतात किंवा संचालक मंडळच यात सामिल असेल तरीही अशा गोष्टी सहज घडू शकतात. याप्रकरणी काहीही घडलेले असो, संचालक मंडळसुध्दा याप्रकरणी दोषी आहे असे समितीचे मत आहे. म्हणून याप्रकरणी समिती अशी ठाम व आग्रहाची शिफारस करीत आहे की, कोणाची तरी सोय करावयाची म्हणून शासनाने संचालक मंडळाच्या नेमणूका करु नयेत. राज्यातील सर्वच महामंडळाच्या बाबतीत बहुतेक करुन अशीच परिस्थिती दिसून येते हे राज्य शासनास भूषणावह नाही. उलट त्यामुळे मंडळे/महामंडळे नुकसानीत येतात म्हणून शासनाने याबाबत अतिशय स्पष्ट धोरण निश्चित केले पाहिजे असे समितीचे ठाम मत आहे. सर्व मंडळे/महामंडळे फायद्यात कशी राहतील, संचालकाच्या नेमणूका करताना कोणत्या कसोट्या लावाव्यात, घोटाळे/भ्रष्टाचार/ लुबाडणूक/फसवणूक कशी होणार नाही, असे काही घडलेच तर ठराविक वेळेतच व कोणचाही मुलाहिजा न ठेवता कठोर कारवाई कोणती करावी, जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशाची काळजी योग्य प्रकारे कशी घ्यावी, अशा अनेक बाबतीत सुयोग्य निर्णय घेण्यासाठी शासनाच्या मुख्य सचिवांनी व संबंधित विभागाच्या सचिवांनी पाऊले उचलावीत शासनाने तसेच महामंडळाने अशा प्रकाराची वेळीच दखल धेऊन कारवाई केली तरच अशा घटनांना आळा बसेल. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा.

याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जो अहवाल प्राप्त झाला त्यामध्ये विधी व न्याय आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे मत घेऊनच सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. मा. मुख्यमंत्र्यांना सदर अहवाल दि.१२ जून २००६ रोजी सादर करण्यात आला आहे. गृह विभागाच्या अहवालामध्येही बॉन्ड प्रकरणात रु.१०.३० कोटींचा आर्थिक घोटाळा, लुबाडणूक, फसवणूक व गुन्हेगारी झाल्याचे म्हटले आहे. असे असूनही श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द पोलीसात तक्रार नोंद करण्यात आली नाही किंवा त्यांची व त्यांच्या नातेवाईकांची मालमत्ता सिल करण्याचे आदेश वरिष्ठांकडून देण्यात आले

नाहीत. वास्तविक या प्रकरणी श्री गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द कारवई करण्याचे सर्व अधिकार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना होते. परंतु त्यांनीही कोणतीही कारवाई केलेली नाही. अशी कारवाई त्यांनी का केली नाही अथवा कारवाई करण्यापासून त्यांना कोणी रोकले याचीही चौकशी होणे गरजेचे आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे अशी चौकशी झालीच तर त्यातून बऱ्याच गोष्टी बाहेर येतील व अशा घटना करणाऱ्यांना फार मोठा वचक बसेल. एखाद्या अधिकाराचा भ्रष्टाचाराचा त्याच्या करिअरवर परिणाम झाल्याची काही उदाहरणे घडल्यास इतरही त्यापासून धडा घेतील व घोटाळे घडण्याची शक्यता हळूहळू कमी होईल. म्हणून समिती या प्रकरणी शिफारस करते की, श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्दचा अहवाल सादर करण्यात आल्यानंतर त्यावर त्वरीत कारवाई का करण्यात आली नाही, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात यावी तसेच त्यांची व त्यांच्या नातेवाईकांची सर्व संपत्ती सील करण्यात यावी व त्यांच्याविरुध्द फौजदारी कारवाई सुरु करावी. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

**दोन: "खाजगी संस्थेला अदेय फायदा" -**

२.१ कलागारांच्या दुरुस्ती कामामध्ये एका खाजगी संस्थेला रुपये ६.०९ कोटीचा अदेय फायदा देण्यात आला होता. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३ मध्ये **" खाजगी संस्थेला अदेय फायदा"** यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) चे दोन कलागार (Studios) तथा प्रसाधन खोल्या कार्यरत होत्या त्यांची दुरुस्ती आवश्यक होती. कंपनीची वित्तीय स्थिती खराब आहे या सबबीखाली कंपनीने या कलागारांच्या संरचनात्मक व तांत्रिक दुरुस्तीसाठी निधी पुरवण्यासाठी मेसर्स हाऊस ऑफ सिने आर्टस् एन्टरप्राइजेस (संस्था) यांचे बरोबर करार केला होता (फेब्रुवारी २०००). करारानुसार संस्थेने स्वत:च्या खर्चाने कलागारांच्या दुरुस्तीचे काम करावयाचे होते व कलागारांपासून मिळणारे अपेक्षित वार्षिक उत्पन्न रुपये १.५० कोटी १५ वर्षाच्या कालावधीसाठी कंपनी व संस्थेने ६५ :३५ या गुणोत्तरात विभागून घ्यावयाचे होते.

<u>लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या</u> :-

* इमारतीच्या केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य अभियंत्याने कंपनीला कळविले होते की (नोव्हेंबर १९९९), इमारतीमध्ये कोणतेही संरचनात्मक किंवा बांधकाम दोष नाहीत व या इमारतीच्या दुरुस्तीचा अंदाजे खर्च रुपये ८० लाख एवढा येईल असे असतांनाही कंपनीने दुरुस्तीची किंमत रुपये तीन कोटी धरुन संस्थेबरोबर महसूल विभाजनाचा करार केला होता (फेब्रुवारी २०००). या दुरुस्तीवर रुपये २.६२ कोटी खर्च झाल्याचे म्हणण्यात आले होते.
* करारामध्ये संस्था दुरुस्तीसाठी पूर्णपणे जबाबदार असल्याचे विहित केलेले असतांनाही स्थापत्यशास्त्रज्ञाची फी म्हणून रुपये २०.४७ लाखाचे प्रदान करण्यात आले होते.
* कंपनीच्या कलागारांचे मूल्य रुपये २० कोटी एवढे होते व त्यांच्या दुरुस्तीवर संस्थेला फक्त रुपये तीन कोटी खर्च करावयाचे असतांना त्यासाठी अपेक्षित रुपये

१.५० कोटी वार्षिक महसुलाच्या ३५ टक्के एवढा जास्त प्रमाणहीत वाटा देण्यात आला होता. पहिल्या १८ महिन्यांच्या कालावधीत कंपनीने संस्थेला रुपये ९७ लाख दिले होते. कंपनीने म्हटल्याप्रमाणे (जुलै २००३), संस्थेने केलेला खर्च प्रत्यक्षात कंपनीद्वारेच पुरविण्यात आलेल्या निधीतून करण्यात आला व त्यामुळे संस्था कोणताही महसूल वाटपासाठी पात्र नव्हती. अशारितीने संस्थेला रुपये ९७ लाखाचा अदेय फायदा देण्यात आला होता.

* कंपनीकडे ३१ मार्च २००० रोजी रुपये २.३६ कोटीच्या मुदत ठेवी व रुपये ३.०५ कोटीची रोख शिल्लक होती. त्यामुळे कंपनी या दुरुस्तीच्या कामासाठी स्वत: निधी पुरविण्याच्या स्थितीत असतांना महसूल वाटप करार करण्याची आवश्यकता नव्हती.
* या व्यतिरिक्त कंपनीने म्हटल्याप्रमाणे (जुलै २००३), ज्यावेळी संस्थेबरोबर सुधारित ज्ञापन करारित करण्यात आले त्यावेळी १५ वर्षाच्या कालावधीसाठीच्या ३५ टक्के भागाचे प्रत्यार्पित मूल्य रुपये ५.१२ कोटी एवढे धरण्यात आले व ते संस्थेकडून इतर करारामधील वसुलीयोग्य कर्ज व अग्रिमामध्ये समायोजित करण्यात आले होते. अशारितीने संस्थेला रुपये ५.१२ कोटीचा अतिरिक्त फायदा करुन देण्यात आला.

कलागारे दुरुस्तीच्या कामामध्ये अशारितीने संस्थेला एकूण रुपये ६.०९ कोटीचा अदेय फायदा करुन देण्यात आला होता.

कंपनीने म्हटले होते (जुलै २००३) की करार रद्द करण्यात आला (११ फेब्रुवारी २००३) होता व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकाऱ्याला जून २००३ मध्ये कामावरुन काढून टाकण्यात आले होते. परंतु व्यवस्थापकीय संचालकाच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती.

ही बाब शासनाला कळविली (जून २००३) होती; उत्तर मिळाले नव्हते. (नोव्हेंबर २००३)

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की,

या संदर्भात सादर करण्यात येते की, संबंधित नस्तीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य अभियंत्यांचे दिनांक २ नोव्हेंबर १९९९ चे पत्रात त्यांनी

असे मत दिलले आहे की, सदर इमारत सुमारे २५ वर्षापेक्षा जास्त जुनी असल्याने त्यात संरचनात्मक अथवा बांधकाम दोष नाहीत असे दिसून येते. परंतु लेखा आक्षेपात म्हटल्याप्रमाणे या पत्रामध्ये या इमारतीच्या दुरुस्तीचा अंदाजे खर्च रु. ८० लाख येईल असे नमूद केलेले नाही. या कामाकरीता नेमण्यात आलेले प्रकल्प सल्लागार मे. पवार आणि वराडे यांनी मात्र या दुरुस्तीच्या कामाकरीता रु.२,६२,१७,९०१/- एवढ्या खर्चाचे मूल्यांकन दिले होते. मात्र ही रक्कम या प्रकल्पावर खर्च झालेली एकूण रक्कम आहे असे सांगता येणार नाही. कारण करारनाम्याच्या अटी शर्तीप्रमाणे कलागार क्र.१ आणि २ च्या दुरुस्तीचा संपूर्ण खर्च मे. हाऊस ऑफ सिने आर्टस यांनी करावाचा होता. आणि त्यामुळे या महामंडळाचा या बाबींशी संबंध येत नाही. मात्र सन २०००-२००१ च्या लेख्यावरुन असे आढळून येते की, या दुरुस्तीवर एकूण रु.८७,९४,२८१/- खर्च झालेला आहे. या बाबींचा उल्लेख मूळ आक्षेपात आढळून येत नाही. तथापि, लेखा आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष खर्च रु. २.६२ कोटी नसून महामंडळाने रु.८७,९४,२८१/- एवढा खर्च केलेला आहे. स्थापत्य-शास्त्रज्ञाची फी म्हणून रु.१४.८१ लाखाचे प्रदान करण्यात आले. ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात कराराच्या अटी/शर्ती भंग करुन स्थापत्य शास्त्रज्ञांना फी म्हणून रक्कम अदा केल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या आक्षेपात नमूद केलेल्या बाबी ह्या वस्तुस्थितीवर आधारलेल्या आहेत. या संदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. लेखा आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती होती असे उपलब्ध अभिलेख्यावरुन दिसून येते. त्यामुळे या संदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रकरणाची छाननी करण्यात येत आहे.

सुधारित करारानुसार इतर करारामधील वसुलीयोग्य कर्जे आणि अग्रिमाची रक्कम ही पुढील १५ वर्षाच्या कालावधीत होणार असलेल्या उत्पन्नाच्या गृहीत रकमेशी समायोजित करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. तथापि, हा विषय नंतरच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यावेळच्या संचालक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत, सादर केला. आणि संचालक मंडळाने ठराव क्र.७९/४ अन्वये "महाराष्ट्र शासनाच्या

महाअधिवक्ता यांच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करावी" असे ठरविल्याचे दिसते. हा विषय संचालक मंडळाच्या ८० व्या बैठकीत ७८ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले तेंव्हाही उपस्थित झाल्याचे दिसते. त्यातही उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना संचालक मंडळाने दिल्या होत्या. दिनांक १०/२/२००३ रोजी दिनांक २९/१०/२००२ चा करारनामा रद्द करण्यात आला आहे.

दिनांक १०/२/२००३ रोजी हाऊस ऑफ सिने आर्ट यांचे सोबत केलेला दिनांक २९/२/२००० चा तसेच दिनांक २९/१०/२००२ चा करारनामा रद्द करण्यात आल्याचा ठराव करण्यात आला. उपरोक्त आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. मूळ परिच्छेदामध्ये ह्या बाबींचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता यासंदर्भात सादर करण्यात येते की, या विषयावरील उपरोक्त लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने संपूर्ण वस्तुस्थिती संचालक मंडळाच्या दिनांक २९/६/२००४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या ९० व्या बैठकीत त्यांच्या निदर्शनास आणण्यात आली. संचालक मंडळाने निर्देश दिल्याप्रमाणे या प्रकरणी अभ्यास करुन त्याबाबतची वस्तुस्थिती मंडळाच्या मा. अध्यक्षांनी या संदर्भात व्यवस्थापकीय संचालकांवर जबाबदारी निश्चित करण्याकरीता आणि त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याकरीता (जर ते दोषी ठरले तर) नस्ती सादर करण्यात येणार आहे. या प्रकरणात सध्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेकडून तपासणी करण्यात येत आहे. तसेच तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द शासनाने शिस्तभंगविषयक विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे. तथापि, उपरोक्त लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने काही नव्याने मुद्दे आता उपस्थित झाल्यामुळे या सर्व प्रकरणाचा सखोल अभ्यास करुन नव्याने आरोप लावणे आवश्यक झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

२.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाबाबत शासनाने असे स्पष्टीकरण व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे. रकाना ५ मध्ये नमूद केलेला महामंडळाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरु करण्यात येईल. सदरहू बाबींचा सध्या गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत तपास सुरु आहे. तसेच तत्कालीन

व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांचेविरुध्द शासनाने विभागीय चौकशी आदेशित केलेली आहे. तथापि, लेखा आक्षेपातील नवीन मुद्दे तपासण्यात येतील.

२.४ महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाने दोन कलागारांच्या संरचनात्मक व तांत्रीक दुरुस्तीसाठी निधी पुरविण्यासाठी ज्या मे. हाऊस ऑफ सिने आर्टस् इंटरप्राईझेस संस्थेबरोबर करार केला होता तीच संस्था दोन्ही कलागारांच्या दुरुस्तीसाठी पूर्णपणे निधी पुरविण्यास जबाबदार असतानाही त्यांना स्थापत्य शास्त्रज्ञ ांची फी म्हणून रु.२०.४७ लाखाचे प्रदान करण्याची कारणे काय आहेत, तसेच यासंदर्भात श्री. गोविंद स्वरुप यांनी रु.६.०९ कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा केलेला आहे ही गंभीर बाब असूनही शासन त्याबद्दल एवढे हतबल का झालेले आहे, त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई का करण्यात आली नाही, या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, याबाबत आता नक्की काही सांगता येणार नाही. कारण या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे विभागाकडे उपलब्ध नाहीत, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांना पत्र पाठवून त्याबाबत माहिती मागविण्यात आली परंतु त्यांनी पत्राला उत्तरच दिलेले नाही. हे प्रकरणही अन्य प्रकरणांबरोबरच विभागीय चौकशीमध्ये होते. आता चौकशी पूर्ण झालेली आहे. या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध नसतानाही या प्रकरणाचा पाठपुरावा करुन जी माहिती मिळाली त्या नुसार कारवाई करण्यात आली आहे. आता सामान्य प्रशासन विभागाकडून पुढील कारवाई करण्यात येणार आहे. लाचलुचपत विभागाच्या चौकशीमध्ये "हम सब एक है, मे. मुक्ता आर्टस्, व्हिडीओ ओशन ग्रुप, कालीया मैदान, मे. गार्नेट पेपर मिल्स, नीलमुद्रा इंटरटेनमेंट, सोनी इंटरटेनमेंट, बीफोरयू" या सर्व संस्थांबरोबर झालेल्या कराराचा समावेश या विभागीय चौकशीमध्ये आहे. विभागीय चौकशीचा अहवाल मा. मुख्यमंत्र्यांना सादर केलेला आहे. त्यावर निर्णय घ्यावयाचे बाकी आहे.

याचसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, या प्रकरणी श्री.डी.एन.चौधरी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आपला अहवाल २००५ मध्ये शासनाला

सादर केलेला आहे. श्री. चौधरी यांनी त्यांच्या अहवालामध्ये श्री. गोविंद स्वरुप यांना निर्दोष ठरविलेले आहे. कारण भ्रष्टाचार सिध्द होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. श्री. चौधरी यांचा अहवाल व लाचलुचपत विभागाचा अहवाल दोन्हीही अहवाल सादर झाले असून श्री. गोविंद स्वरुप यांच्याकडून ही वैयक्तीक स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. या सर्व प्रकरणांवर आता मा. मुख्यमंत्री यांनी निर्णय घ्यायचा आहे.

मे. सिने आर्टस् इंटरप्राईझेसने कलागारांच्या दुरुस्तीसाठी रु.९७ लक्ष खर्च केले. हा खर्च त्यांनी महामंडळाने केलेल्या अंशदानातून भागविण्यात आला आहे. या खाजगी संस्थेने सर्व खर्च स्वत:च्या भांडवलातून करावयाचा होता तरच त्यांना महसूलातील हिस्सा द्यावयाचा असे ठरले होते. परंतु खाजगी संस्थेकडे कोणतेही अंशदान नसताना व खर्चाची रक्कम महामंडळाच्या अंशदानातून भागविली जात असताना या संस्थेला महसूलातील हिस्सा का देण्यात आला या समितीच्या प्रश्नास उत्तर देताना विभागीय सचिवांनी हा आक्षेप बरोबर असल्याचे मान्य केले. त्यांनी पुढे असेह सांगितले की, हे चुकीच्या पध्दतीने का केले गेले याबाबतची कागदपत्रे उपलब्ध नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांनाही विचारणा करण्यात आली होती. शेवटी हा मुद्दा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीमध्ये समाविष्ट करण्याबाबत त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

महामंडळाकडे ३१ मार्च २००० रोजी २.३६ कोटी रुपयाच्या मुदतठेवी व ३.०५ कोटी रुपये रोख शिल्लक असताना व या दुरुस्तीच्या कामासाठी महामंडळ स्वत: निधी पुरविण्यास सक्षम असताना कलागारांच्या दुरुस्तीसाठी खाजगी संस्थेबरोबर संयुक्त प्रकल्प करार का करण्यात आला या प्रश्नास उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या संबंधीची टिप्पणी अभिलेखामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबत आता माहिती सांगता येत नाही. ज्यांनी करार केला तेच याबाबत सांगू शकतील. त्यांनी पुढे असे सांगितले की, महालेखापालांनी याबाबत आक्षेप घेतल्यानंतर व नंतर तपास केल्यानंतर सदर टिप्पणी अभिलेखात नसल्याचे दिसून आले. प्रत्येक महामंडळाने दरवर्षी अंतर्गत लेखातपासणी केली पाहिजे. तसे या महामंडळाची अंतर्गत लेखा तपासणी होते काय व होत असल्यास, त्यांनी हा मुद्दा निदर्शनास आणला होता काय,

तसे नसेल तर ते लोकही यात दोषी आहेत. याबाबत समितीने विचारणा केली असता, सांगण्यात आले की, अंतर्गत लेखा परिक्षण दरवर्षी करण्यात येते तसे करण्यात आले होते व त्यांनी यासंबंधी विशेष अहवाल तयार करुन ही बाब निदर्शनास आणली होती व महालेखापालांनाही अंतर्गत लेखाअहवाल देण्यात आला होता. त्यावेळी महामंडळाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. शुक्ला होते. महामंडळाने त्यांची विभागीय चौकशी केली असता, ते चौकशीत दोषी आढळून आले. त्यामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. मात्र व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप हे सनदी अधिकारी असल्याने त्यांच्यावर तातडीने कारवाई होऊ शकली नाही. प्रकरण सद्या मा. मुख्यमंत्री यांचेकडे कारवाईसाठी प्रलंबित आहे.

२.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्यावेळी मिळालेली माहिती यावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित या कंपनीचे दोन कलागार (studios) तथा प्रसाधन खोल्या कार्यरत होत्या. त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक होते. महामंडळाची वित्तीय स्थिती खराब आहे या सबबीखाली या कलागारांच्या संरचनात्मक व तांत्रिक दुरुस्तीसाठी निधी पुरविण्यासाठी मे. हाऊस ऑफ सिनेआर्टस् इंटरप्रायजेस या संस्थेबरोबर फेब्रुवारी २००० मध्ये करार करण्यात आला होता. त्यानुसार संस्थेने स्वतःच्या खर्चाने कलागारांच्या दुरुस्तीचे काम करावयाचे होते व कलागारांपासून मिळणारे अपेक्षित वार्षिक उत्पन्न रु.१.५० कोटी १५ वर्षाच्या कालावधीसाठी कंपनी व संस्थेने ६५.३५ या गुणोत्तरात घ्यावयाचे होते. या इमारतीच्या केलेल्या सर्व्हेक्षणावरुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य अभियंत्याने नोव्हेंबर १९९९ मध्ये कळविले होते की, इमारतीमध्ये संरचनात्मक किंवा बांधकाम दोष नाहीत व इमारतीच्या दुरुस्तीचा खर्च अंदाजे ८० लाख एवढा येईल असे असताना कंपनीने दुरुस्तीची किंमत रुपये ३ कोटी धरुन संस्थेबरोबर महसूल विभाजनाचा करार केला होता. कराराप्रमाणे दुरुस्तीची पूर्ण जबाबदारी संस्थेची असताना स्थपत्य शास्त्रज्ञाची फी रु. २०.४७ लाखाचे प्रदान महामंडळाने केले. महामंडळाने संस्थेला देय नसतानाही रु.९७ लाख रुपये दिले होते

याच रकमेतून संस्थेने खर्च केला होता. ३१ मार्च २००० रोजी कंपनीकडे रु.२.३६ कोटीच्या मुदत ठेवी व ३.०५ कोटीची रोख शिल्लक होती. त्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी निधी असताना संस्थेशी करार करण्याची आवश्यकता नव्हती शिवाय सुधारीत ज्ञापन करारित करतेवेळी १५ वर्षासाठी ३५ टक्के भागांचे प्रत्यार्प्रित मूल्य रु.५.१२ कोटी धरण्यात आले. अशाप्रकारे संस्थेला एकूण ६.०९ कोटीचा अदेय फायदा करुन देण्यात आला.

समितीसमोर आलेल्या माहितीवरुन असे दिसते की, सिने आर्टस् इंटरप्रायजेस संस्था करारानुसार दोन्ही कलागारांच्या दुरुस्तीसाठी निधी पुरविण्यास जबाबदार असतानाही स्थापत्यशास्त्रज्ञाची फी रु. २०.४७ लाखांचे प्रदान व इतर सर्व खर्च मिळून ६.०९ कोटी रुपये महामंडळाने संस्थेला का प्रदान केले. या संबंधी साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सांगितले की, "यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे महामंडळाकडे उपलब्ध नाहीत. शिवाय त्यावेळच्या व्यवस्थापकीय संचालकांना (श्री. गोविंदस्वरुप) विचारुनही त्यांनी कोणतीही माहिती विभागाला दिलेली नाही. याप्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. तसेच लाचलुचपत विभागाने आठप्रकरणांची चौकशी करुन त्याचा अहवाल दिलेला आहे. मात्र श्री. डी.एन. चौधरी यांनी केलेल्या चौकशीमध्ये श्री. गोविंद स्वरुप यांना निर्दोष ठरविलेले आहे." याबाबत समितीचे मत असे आहे की, ज्याअर्थी या प्रकरणांची सर्व कागदपत्रेच उपलब्ध नाहीत त्याअर्थी श्री. चौधरी यांनी कशाच्या आधारे निष्कर्ष काढले हा प्रश्न उपस्थित होतो. समितीच्या मते जाणूनबुजून ही कागदपत्रे गहाळ करण्यात आली आहेत. ही कागदपत्रे निश्चितच श्री. गोविंद स्वरुप यांचेकडे असणार. आता श्री. चौधरी यांचा अहवाल तसेच लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचा अहवाल हे दोन्ही मा. मुख्यमंत्र्यांना सादर झालेले आहेत व त्यांनीच यावर निर्णय घ्यावयाचा आहे. परंतु श्री. गोविंद स्वरुप हे ऑगस्ट ०६ मध्ये सेवानिवृत्त झाले. तोपर्यंत त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई झालेली नव्हती. वास्तविक श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द या महामंडळासंबंधात आठ प्रकरणे आहेत. सर्वच प्रकरणामध्ये घोटाळा झालेला आहे हे उघड आहे. तेंव्हा पहिले दुसरे प्रकरण उजेडात आल्याबरोबर त्यांची महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावरुन त्वरीत

बदली करावयास हवी होती म्हणजे इतर प्रकरणे करण्यास त्यांना वाव मिळाला नसता. परंतु त्यांना बराच काळ या पदावर ठेवण्यात आले व हे मुद्दामच ठेवण्यात आले असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यांचेविरुध्दच्या सर्वच प्रकरणांचा खरं म्हणजे एकत्रितचा विचार करणे आवश्यक आहे. एवढे घोटाळे होऊनही आणि सर्व चौकशींचे अहवाल मा. मुख्यमंत्र्यांपर्यंत सादर होऊनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही याचे समितीस आश्चर्य वाटते. यासंबंधात समितीचे असे मत झाले आहे की, श्री. गोविंद स्वरुप यांना या पदावर बराच काळ मुद्दाम ठेवण्यात कोणाचे तरी हितसंबंध गुंतले होते आणि त्यांना पूर्णपणे संरक्षण देण्यात आले होते. सर्वच प्रकरणांचा विचार करता हे घोटाळे ५० कोटीच्या वर झालेले आहेत. ही रक्कम वसूल करणे किंवा श्री. स्वरुप यांच्यावर कारवाई करणे ही अत्यंत जिकरीची बाब आहे. म्हणून या सर्वच प्रकरणी समिती अशी आग्रहाची शिफारस करते की, श्री. गोविंद स्वरुप यांच्यावर पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी अन्य प्रकरणांबरोबरच हे प्रकरण देखिल गुन्हे अन्वेषण विभागाकडे सुपूर्द करण्यात यावे व त्यांना जलदगतीने या प्रकरणाचा पाठपूरावा करण्याचे निदेश द्यावेत. महामंडळाने तसेच शासनाने या प्रकरणासंबंधातील कागदपत्रे श्री. गोविंद स्वरुप यांचेकडून मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यांनी नकार दिल्यास वेळप्रसंगी कायद्याचा बडगा त्यांना दाखवून त्यांचेकडून कागदपत्रे मिळवावीत. महामंडळाने देखिल इत:पर कार्यालयीन कागदपत्रे कार्यालयाबाहेर नेली जाणार नाहीत यादृष्टीने आपल्या कार्यपध्दतीत बदल करावा. जेणेकरुन कागदपत्रे मिळत नाहीत अशी सबब सांगण्याची नामुष्कीची पाळी महामंडळावर येणार नाही. या प्रकरणी तातडीने कारवाई करण्यात यावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

साक्षीच्या वेळी या महामंडळाच्या अंतर्गत लेखा परिक्षणाबाबतही चर्चा झाली. या महामंडळाचे अंतर्गत लेखा परिक्षण दरवर्षी होते तसे यावर्षी करण्यात आले होते. तसेच लेखा परिक्षकांनी त्यासंबंधी विशेष अहवाल तयार करुन ही बाब शासनाच्या निदर्शनास आणली होती आणि महालेखापालांनाही अंतर्गत लेखा परिक्षा अहवाल देण्यात आला होता. तथापि, त्यावेळचे महामंडळाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.

शुक्ला होते. महामंडळाने त्यांची विभागाची चौकशी केली असता, ते चौकशीत दोषी आढळून आले. त्यामुळे त्यांना सेवेतून त्वरीत बडतर्फ करण्यात आले. मात्र श्री. गोविंद स्वरुप हे सनदी अधिकारी असल्याने त्यांच्यावर तातडीने कारवाई होऊ शकली नाही. वास्तविक अंतर्गत लेखा परिक्षण हा प्रत्येक संस्थेचा अत्यंत महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. वर्षभरात झालेल्या चांगल्या-वाईट सर्व कामांचा खर्चाचा त्यात समावेश होत असतो. तशी ती यंत्रणा या महामंडळामध्येही आहे व तीने तिचे काम योग्य व चोख बजावले अशी समितीची धारणा आहे. कारण अंतर्गत लेखा परिक्षणाचा विशेष अहवाल त्यांनी शासनास व महालेखापालांनाही सादर केलेला आहे. त्यावरुनच मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याची विभागीय चौकशी होऊन त्यांना दोषी ठरवून बडतर्फ करण्यात आले. याचा अर्थ असा की, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे संगनमत होऊनच हे सर्व घोटाळे झालेले आहेत. तथापि, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांना देखिल केवळ बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांच्यावर पुढे नूकसान भरपाई बाबतची इतर कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती समितीला कळू शकली नाही. म्हणून समिती यासंदर्भात अशी शिफारस करते की, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून श्री. शुक्ला यांच्या संपूर्ण मालमत्तेची चौकशी करण्यात यावी आणि त्यांनी या व्यवहारातून गैरमार्गाने मिळविलेली सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई सुरु करावी. यावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा.

## तीन :"<u>प्रतिभूतीच्या अभावामुळे कर्जाची वसुली न होणे</u>" -

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.४ मध्ये **" प्रतिभूतीच्या अभावामुळे कर्जाची वसुली न होणे"** यासंबंधातील महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

प्रतिभूती शिवाय वित्तीय सहाय्याचे वितरण केल्यामुळे कंपनीचे रुपये २.०२ कोटीचे येणे वसूल झाले नव्हते.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने "दि इनव्हेडर्स" नावाची द्विभाषिक चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या बीज भांडवलामधील तफावत भरुन काढण्यासाठी रुपये १.७० कोटीचे अर्थसहाय्य पुरवण्यासाठी नीलमुद्रा इन्टरटेनमेन्ट मर्यादित (एनईएल) बरोबर करार केला (मार्च २००२) होता. कंपनीने केलेला करार १० फेब्रुवारी २००३ रोजी रद्द केला व वित्तीय सहाय्याची त्यावरील व्याजासह परतफेड करण्यास सांगितले.

लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या :-

* व्यवस्थापकीय संचालकाने करार संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय केला होता.
* कर्ज संवितरित करतेवेळी (मार्च-सप्टेंबर २००२) बँकेकडून हमी मिळविण्याऐवजी वित्तीय सहाय्य संवितरित केल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत (मार्च २००४ अखेर) बँकहमी सादर करावी अशी तरतूद करारात करण्यात आली होती.
* करारात तरतूद केल्याप्रमाणे जर कसूर झाली तर हमी म्हणून दोन कोटी मूल्याची मालमत्ता हमी म्हणून ठेवायची होती. परंतु असे निदर्शनास आले की (मार्च २००३) एनईएलच्या मालकीच्या मत्तांची किंमत फक्त रुपये २.६४ लाख एवढीच होती.
* विहीत केलेल्या रुपये १.७० कोटी अग्रिमा ऐवजी कंपनीने मार्च-सप्टेंबर २००२ या कालावधीत रुपये १.९५ कोटीचे अग्रिम दिले होते. ३१ मार्च २००३ रोजी

संस्थेकडून रुपये २.१७ कोटी (मुद्दल : रुपये १.९५ कोटी व व्याज : रुपये २१.८९ लाख) वसूल करावयाचे होते.

कंपननीने म्हटले होते (जुलै २००३) की, एनईएलकडून रुपये १५ लाखाची रक्कम वसूल करण्यात आली व उर्वरित रक्कम करार रद्द केल्यापासून (१० फेब्रुवारी २००३) १५० दिवसांमध्ये वसूल करण्यात येईल. विहित केलेला कालावधी १० जुलै २००३ रोजी संपला असतांनाही उर्वरित रुपये २.०२ कोटीची रक्कम करारात वित्तीय सहाय्य सुरक्षेसाठी तरतूद नसल्यामुळे वसूल झाली नाही (ऑगस्ट २००३) या प्रकरणात केलेल्या गंभिर चुकांसाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली याबाबत उत्तरात कांहीही म्हटले नव्हते.

ही बाब शासनाला कळविली (जुन २००३) होती. उत्तर मिळाले नव्हते (नोव्हेंबर २००३)

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की,

यासंदर्भातील करार दिनांक ४/३/२००२ रोजी करण्यात आला. परंतु त्यासंदर्भात वित्तीय सहाय्य करण्याबाबतचा प्रस्ताव मात्र संचालक मंडळापुढे दिनांक २/४/२००२ रोजी सादर करण्यात आला. यावरुन असे दिसून येते की याबाबतचा करार संचालक मंडळाची परवानगी न घेता करण्यात आलेला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या ७९ बैठकीत हा करार रद्द करण्याबाबतचा ठराव पारित केलेला आहे. कारण तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी निलमुद्रा कम्युनिकेशन यांच्याशी केलेला करार महामंडळाच्या हिताचा नव्हता. परंतु मूळ करार आता रद्द झाल्यामुळे आता हा मुद्दा उरत नाही अशी धारणा आहे.

महामंडळाने जिल्हाधिकारी, मुंबई यांनी सदरची रक्कम मे. निलमुद्रा यांच्याकडून महसुल वसुली प्रमाणपत्र आधारे वसुल करण्याबाबत कळविले होते. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, मुंबई यांनी रु.१५.०० लाखाची रक्कम वसुल करुन महामंडळाला दिलेली आहे. याप्रमाणे रु.१९५ लाखापैकी रु.१८० लाख एवढी रक्कम वसुल करावयाची राहिली आहे. या रु. १५ लाखाच्या वसुलीच्या संदर्भात मे. निलमुद्रा यांनी याचिका क्र.१४३८/२००३ मा. उच्च न्यायालयात दाखल केली होती. तथापि, त्या

प्रकरणातील सुनावणीत महामंडळाने मा. उच्च न्यायालयाला मे. निलमुद्रा यांच्याकडून प्राप्त झालेली दिनांक १०/४/२००३ व १४/५/२००३ ची पत्रे सादर केलीत. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदरची याचिका काढून घेण्याची अनुमती मे. निलमुद्रा यांना दिली. दिनांक १४/५/२००३ च्या पत्रान्वये मे. निलमुद्रा यांनी मूळ कराराप्रमाणे संपूर्ण रक्कम १५० दिवसांत परत करण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, ती रक्कम त्यांनी परत केलेली नाही किंवा ती कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे याबाबत मे. निलमुद्रा यांच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाने संचालक मंडळाच्या ९० व्या बैठकीत सादर केला होता. आणि संचालक मंडळाने त्यास मान्यता दिलेली आहे. संबंधित न्यायालयात दिवाणी दावा दाखल करण्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे महामंडळाच्या वकीलांकडे पाठविण्यात आली आहेत. न्यायालयात दाखल करावयाच्या दाव्याबाबतचा अर्ज महामंडळाच्या वकीलांनी तयार करुन दिला असून दावा दाखल करण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येत आहे. यासंदर्भात सादर करण्यात येते की, मूळ करारास संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली नव्हती. संचालक मंडळाच्या ७७ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ७७/५ अन्वये संचालक मंडळाच्या अनुमतीशिवाय निलमुद्रा कम्युनिकेशनला दिल्या गेलेल्या रकमेबाबत मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांना भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना लागू असलेल्या वर्तणूक नियमानुसार चौकशी करुन कारवाई करण्याबाबत कळवावे असे ठरले. त्याप्रमाणे महामंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांनी याबाबत मुख्यमंत्र्यांना कळविले होते. तसेच नंतर ७९ व्या बैठकीत संचालक मंडळाने सदर करारनामा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द या संदर्भात चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून त्यांच्याविरुध्दच्या आरोपपत्रात मे. निलमुद्रा एंटरटेनमेंट यांच्याशी संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय करारनामा करण्याबद्दल आणि मे. निलमुद्रा यांना अर्थसहाय्य करण्याबद्दलच्या आरोपांचा समावेश आहे. वर नमूद केल्याप्रमाणे मेसर्स निलमुद्रा यांच्याविरुध्द वसुलीकरीता दिवाणी दावा दाखल करण्याबाबत संचालक मंडळाने ९०व्या बैठक्तीत मान्यता दिली आहे. याबाबतदची कागदपत्रे / अभिलेख वकीलांकडे सादर करण्यात आले असून याबाबत

न्यायालयात सादर करावयाचा अर्ज तयार करुन दिला आहे. अशाप्रकारे दिवाणी दावा लवकरच दाखल करण्यात येत आहे.

याबाबतचा मूळ करारनामा आणि श्री. गोविंद स्वरुप यांनी स्वाक्षरी केलेली एक टिप्पणी महामंडळाच्या अभिलेख्यात उपलब्ध आहे. लेखा आक्षेपात नमूद केलेल्या मुद्दयांबाबत खुलासा व माहिती श्री. गोविंद स्वरुप यांच्याकडून मागविण्यात आली आहे. त्याबाबतचे पत्र यापूर्वीच पाठविण्यात आले असून त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, वरील लेखा आक्षेपात उपस्थित केलेले मुद्दयांसंदर्भातील अभिलेख/नस्ती/कागदपत्रे इत्यादि महामंडळाच्या अभिलेख्यात उपलब्ध नाहीत. त्यामुळे लेखा आक्षेपांना उत्तरे देण्यास अडचण निर्माण झाली आहे. कार्यालयात अभिलेख/नस्ती यांचा सखोल तपास करुन ते उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे याबाबत शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला होता. शासनाने यासंदर्भात विविध विषयावरील अभिलेख / नस्ती*/ कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तपासणी करण्याकरीता एका समितीची स्थापना केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर समिती तपास करीत आहे. लाचलुचपत प्रतिबंधक शाखेमार्फत देखील चौकशी सुरु असल्याने त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी धाडी घातलेल्या आहेत. त्यात त्यांना काही कागदपत्रे उपलब्ध झाली असतील म्हणून समितीने त्यांच्याकडे ही कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध झाली काय, याबाबतची माहिती देण्याची विनंती करणारे पत्र पाठविले असून जे अभिलेख अथवा कागदपत्रे प्राप्त झाली आहेत त्याची एक प्रत महामंडळाला उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली आहे.

३.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाबाबत शासनाने असे स्पष्टीकरण व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे. महामंडळाने यापूर्वीच सदरहू करारनामा रद्द केला असून मेसर्स नीलमुद्रा यांच्याकडून वसूली करण्याकरीता कोर्टात दिवाणी दावा दाखल करण्याबद्दलची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द विहीत दोषारोपांची चौकशी करण्याकरीता विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मेसर्स नीलमुद्रा

यांच्याशी संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय केलेला करारनामा आणि अदा केलेली रक्कम या मुद्यांचा समावेश आहे. महामंडळाने असा अहवाल सादर केला आहे की, सदरहू प्रकरणाशी संबंधित फाईल्स व कागदपत्रे यांचा महामंडळामध्ये शोध लागत नाही. म्हणून सदरहू प्रकरणी चौकशी करुन हरवलेल्या फाईल्स व कागदपत्रांचा शोध घेण्याकरीता शासनाने एक समिती नियुक्त केलेली असून समितीने शोध घेण्याचे काम सुरु केलेले आहे. गुन्हा व अन्वेषण शाखा या प्रकरणी चौकशी करीत असून अशी माहिती मिळाली आहे की त्यांनी विविध ठिकाणी घातलेल्या धाडीमध्ये काही कागदपत्रे सापडलेली आहेत. त्यामुळे सदरहू समितीने गुन्हे व अन्वेषण शाखेकडे अशी विनंती केली आहे की, त्यांनी या प्रकरणातील काही कागदपत्रे सापडली असल्यास कळवावे व सापडलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

३.४ समितीसमोर लेखीं स्वरुपात प्राप्त झालेली माहिती विचारात घेऊन साक्षीचे वेळी नीलमुद्रा इंटरटेनमेंट बरोबर केलेल्या बीज भांडवल सहाय्य करारास संचालक मंडळाची मान्यता का घेण्यात आली नव्हती या समितीच्या प्रश्नास सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांनी उत्तर देताना स्पष्ट केले की, या संबंधीचा करार दिनांक ४ मार्च २००२ रोजी करण्यात आला व नंतर तो दिनांक २ एप्रिल २००२ रोजी संचालक मंडळासमोर मान्यतेस आणण्यात आला. करार प्रथम केला व नंतर संचालक मंडळासमोर आणण्यात आला असे का करण्यात आले याबाबत विभागीय सचिव माहिती देऊ शकल्या नाहीत. त्यांनी पुढे असे सांगितले की, संचालक मंडळाने करारास मान्यता न देता तो मा. मुख्यमंत्र्यांना अवगत करावा असे मत व्यक्त केले. या प्रकरणामध्ये नीलमुद्रा इंटरटेनमेंट या संस्थेला बरोबर घेऊन दि. इंन्व्हेडर्स नावाचा चित्रपट तयार करण्याची योजना होती. त्याकरिता चित्र नगरीने बीजभांडवल द्यावयाचे असा प्रस्ताव होता म्हणून नीलमुद्रा इंटरटेनमेंटला १ कोटी ७० लाख रुपये देण्यात आले. यापूर्वी देण्यात आलेली रक्कम व आताची मिळून २ कोटी ०२ लाख एकूण रक्कम देण्यात आली. ज्वाईंट व्हेंचर म्हणून त्यांचा हिस्सा होता. ही रक्कम वसूल करण्यासाठी मे. हाऊस ऑफ सिने आर्टस् व नीलमुद्रा इंटरटेनमेंट यांच्यावर न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे. त्यापूर्वी ही बाब लक्षात आल्यावर

त्यावेळच्या सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून तक्रार केली होती. तसेच संचालक मंडळासमोर हा विषय आल्यानंतर त्यांनी ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेतला. त्यानुसार जो करार महामंडळाच्या हिताविरुध्द आहे आणि महामंडळाच्या संचालक मंडळाची त्यास मान्यता नाही असा करार बंधनकारक नाही तो रद्दबातल करणे किंवा नाकारणे यासंबंधीचा निर्णय संचालक मंडळ धेऊ शकते म्हणून संचालक मंडळाने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला व आता करार अस्तित्वात नाही म्हणून न्यायालयात रक्कम वसूल करण्यासाठी केस करण्यात आली आहे. एका प्रश्नाच्या उत्तरात सचिवांनी असाही खुलासा केला की, व्यवस्थापकीय संचालकांना स्वतःला कोणतेही अधिकार नसताना त्यांनी ही रक्कम दिलेली आहे. यामध्ये बँक गॅरन्टीचाही विचार करण्यात आलेला नाही आणि नियम धाब्यावर बसवून हा व्यवहार करण्यात आलेला आहे. या प्रकरणी केवळ करार रद्द करुन उपयोग नाही तर त्या पार्टीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावयास हवा होता. केंद्र सरकारसुध्दा याच पध्दतीचा अवलंब करते असे असताना त्या पार्टीविरुध्द गुन्हा का दाखल करण्यात आला नाही? या प्रश्नास उत्तर देण्यात आले की, चार व्यक्तिविरुध्द चौकशी चालू आहे आणि लाचलुचपत खात्याकडे तक्रार केलेली आहे. लाचलुचपत खात्याने चौकशी पूर्ण केल्यानंतर भारतीय दंड विधान संहिता कलम ४०९, ४२०, १२० व कलम १३ (१) आणि १३ (२) खाली श्री. गोविंद स्वरुप, श्री. ए.जी. शुक्ला, श्री. शाहाब अहमद आणि श्रीमती विमला यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरहू प्रकरणी संबंधीत फाईल्स व कागदपत्रे याचा महामंडळामध्ये शोध लागत नाही असा महामंडळाचा अहवाल आल्यानंतर हरवलेल्या फाईल्स व कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी शासनामार्फत एक समिती नियुक्त करण्यात आली. कागदपत्रांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे.

श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाशी संबंधित अशी किती प्रकरणे आहेत अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, हम एक है, हाऊस ऑफ सिने आर्टस्, नीलमुद्रा, बीफोरयू, सोनी इंटरटेनमेंट वगैरे प्रकरणे आहेत. श्री. गोविंद स्वरुप हे २-३ वेळा व बराच काळ त्या पदावर होते. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की,

आर्थीकदृष्ट्या सबळ असणारे महामंडळ डबघाईस आणणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांना पाठिशी घालणे हा सामाजिक गुन्हा आहे. त्यांच्याविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप सिध्द झालेले आहेत. गृह विभागानेही फौजदारी कारवाई करण्यास संमती दिली आहे. अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यास सेवेत ठेवणे ही गंभीर बाब आहे. ते निवृत्त होण्यापूर्वी त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. शासनाने याची नोंद घ्यावी. श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द पोलीसात फसवणूकीचा गुन्हा नोंद करण्यासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासंबंधात इतर आरोपीसह मा. मुख्यमंत्र्यांकडे परवानगीसाठी फाईल सादर झालेली आहे. अशी परवानगी मिळाल्याशिवाय चार्ज शिट दाखल करता येणार नाही. परंतु अद्याप परवानगी मिळालेली नाही असेही सचिवांनी स्पष्ट केले. तसेच आर्थिक गुन्हे शाखेकडे केस नोंद केलेली आहे आणि त्याखाली फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. परंतु फौजदारी प्रक्रिया आणि आर्थीक गुन्हे शाखा या प्रक्रिया वेगळया असल्याचे स्प्ष्ट करुन समितीने सचिवांचे मत खोडून काढले.

३.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांनी "दि. इन्व्हेडर्स" नावाच्य द्विभाषिक चित्रपट निर्मितीसाठी नीलमुद्रा इंटरटेनमेंट मर्यादित (एनईएल) बरोबर एक करार केला होता. त्यानुसार बीज भांडवल तफावत भरुन काढण्यासाठी एकूण रुपये २.०२ कोटीचे अर्थसहाय्य एनईएल ला करुन दि. ४ मार्च २००२ रोजी करार करण्यात आला. तो करार नंतर २ एप्रिल २००२ रोजी संचालक मंडळासमोर मान्यतेसाठी मांडण्यात आला. मात्र संचालक मंडळाने करारास मान्यता न देता ही बाब मा. मुख्यमंत्र्यांना अवगत करावी असे सूचविले व त्याचवेळी महाअधिवक्ता, महाराष्ट्र शासन यांचाही सल्ला घेतला. त्या सल्ल्यानुसार संचालक मंडळाने कराराला मान्यता न देता करार रद्द केला. शिवाय ही बाब त्यावेळच्या सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मा. मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे तक्रार केली होती. कारण करार संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय केला होता आणि रक्कम वितरीत करतेवेळी बँकेकडून हमी मिळविल्याशिवाय वित्तीय सहाय्य वितरीत केले होते. तसेच हमी म्हणून

कर्जदाराकडून दोन कोटी रुपयांची मालमत्ता ठेवावयाची होती. परंतु त्यांच्या मालकिच्या मालमत्तेची किंमत फक्त रु.२.६४ लाख एवढीच होती. व्याजासह त्या संस्थेकडून रु.२.१७ कोटी वसूल करावयाचे होते. ही रक्कम वसूल करण्यासाठी मे. हाऊस ऑफ सिने आर्टस् व नीलमुद्रा इंटरटेनमेंट यांच्यावर न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे. यात चार व्यक्तीना आरोपी करण्यात आले आहे.

समितीसमोर आलेल्या माहितीनुसार त्यावेळच्या सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी ही बाब मा. मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास पत्राद्वारे आणण्यात आली होती. परंतु त्यावर कोणतीच कारवाई झाल्याचे दिसत नाही. ही गोष्ट २००३ मधील आहे. जर श्री. गोविंद स्वरुप यांच्यावर त्याचवेळी कारवाई करण्यात आली असती तर पुढील अनर्थ टाळता आला असता. परंतु त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई होत नसल्याने श्री. गोविंद स्वरुप यांचे आर्थिक घोटाळे वाढतच गेले. या घोटाळ्यांमधील आर्थिक नुकसानही फार मोठे आहे. त्यामुळे खरेतर श्री. स्वरुप यांची तेथून (महामंडळातून) त्वरित बदली झाली पाहिजे होती. परंतू ना त्यांची बदली झाली ना त्यांचेकडून व सांस्कृतिक कार्य खात्याचा कारभार काढून घेतला गेला. दोन्ही ठिकाणी तेच प्रमुख राहिल्याने मूळात हे घोटाळे लवकर बाहेर आलेच नाहीत व लक्षात आले तेव्हा फार उशिर झाला होता. म्हणून समिती यासंबंधात स्पष्टपणे अशी शिफारस करते की, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्री.गोविंद स्वरुप यांनी केलेल्या सर्वच घोटाळ्याबाबत चौकशी करण्यासाठी ही प्रकरणे एकत्रित स्वरुपात गुन्हे अन्वेषण व्यूरोकडे सोपविण्यात यावीत, तसेच महामंडळाच्या झालेल्या या नुकसानीबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांचेकडून ही एकूण रक्कम व्याजासह वसूल करण्याचे दृष्टीने कारवाई करण्यात यावी. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

महामंडळाचा कारभार चालवितांना एकट्या व्यवस्थापकीय संचालकांना पूर्ण स्वातंत्र्य दिलेले नाही. त्यांच्या जोडीला संचालक मंडळही आहे. सर्वांनी मिळून महामंडळाच्या हिताला प्राधान्य देऊन कारभार चालवावयाचा आहे. परंतु या प्रकरणी व्यवस्थापकीय संचालकांनी स्वतःला पूर्ण अधिकार नसतानाही, संचालक मंडळाची

मान्यता न घेता व बँक गॅरन्टीचा विचार न करता, सर्व नियम धाब्यावर बसवून एकट्यानी हा सर्व व्यवहार केलेला आहे. हे सर्व लक्षात घेता त्यांनी उघडउघड मनमानी केली आहे व संचालक मंडळाला अंधारात ठेवले आहे. अर्थात नंतर संचालक मंडळाने महाअधिवक्त्यांच्या सल्ल्याने हा करार रद्द केला ही चांगली गोष्ट आहे, परंतु संचालक मंडळ सुरुवातीपासूनच जागृत असते तर असे घडले नसते. उशिर का होईना संचालक मंडळाने धडाडी दाखविली ही आनंदाचीच बाब समजली पाहिजे. इतर प्रकरणीही संचालक मंडळाने अशी धडाडी दाखविली असती तर ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे घोटाळे घडले नसते. पण येथे पाणी कुठेतरी मुरते आहे अशी समितीला रास्त शंका आहे म्हणूनच संचालक मंडळावर नेमणूका करताना शासनाने विशेष काळजी घ्यावी अशी समितीने अन्य एका प्रकरणी शिफारस सुध्दा केलेली आहे, तिचा समिती पुनरुच्चार करु इच्छिते. समिती पुढे अशीही शिफारस करते की, जरी श्री. गोविंद स्वरुप सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांच्याकडून महामंडळाचे झालेले सर्व आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे व त्यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई करण्यात यावी व त्याचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठवावा.

या प्रकरणाच्या संबंधीत फाईल्स व कागदपत्रे महामंडळाच्या कार्यालयामध्ये मिळून येत नाहीत. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात अडथळा येत आहे व ही कागदपत्रे शोधण्यासाठी एका समितीचे गठन करण्यात आले आहे, असे साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. ज्याअर्थी संबंधित फाईल्स व कागदपत्रे गायब करण्यात आली आहेत त्याअर्थी हे नियमबाह्य, गैरप्रकाराचे व भ्रष्टाचाराचे प्रकरण दडपण्याचा व्यवस्थापकीय संचालकांचा हेतू आहे हे उघड आहे. म्हणून समितीची महत्त्वाची व आग्रहाची अशी शिफारस आहे की, सदर कागदपत्रांचा शोध तर घेण्यात यावाच, परंतु झालेला व्यवहार हा उघड असल्याने परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे त्यांचेविरुध्द लुबाडणूक, फसवणूक, भ्रष्टाचार आदि कारणांवरुन फौजदारी प्रक्रिया सुरु करावी. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठवावा.

# बैठकींचे परिशिष्ट

## बुधवार, दिनांक १४ जून, २००६ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

१. श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. सुरेश वरपूडकर, वि.स.स.
(३) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(४) श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स.
(५) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
(६) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(७) श्री. अरविंद नेरकर, वि.स.स.
(८) श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स.
(९) श्री. प्रतापराव जाधव, वि.स.स.
(१०) श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स.
(११) डॉ. विनय नातू, वि.स.स.
(१२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(१३) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(१४) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(१५) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
(१६) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.
(१७) श्री.अरविंद सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. रमेश मुकणे, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**

श्री.जी.एन.सुंन्दरराजा महालेखाकार

**साक्षीदार**

**सांस्कृतिक कार्य विभाग**

श्रीमती संजीवनी कुट्टी, सचिव.

**महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ**

श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक,

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## ------ार, दिनांक ----नोव्हेंबर, २००६ विधानभवन, मुंबई.
## उपस्थिती.

**समिती प्रमुख**

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२)
(३)
(४)
(५)
(६)
(७)
(८)
(९)
(१०)
(११)
(१२)
(१३)
(१४)
(१५)
(१६)
(१७)
(१८)
(१९)
(२०)
(२१)
(२२)
* (२३)
(२४)
(२५)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव,
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.